
*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege. org, 9226563052*

---

## युनिट 8 : प्रो. दया कृष्ण

**Daya Krishna**
(1924-2007)
creative and original Indian philosopher of the second half of the 20th century. His thought and philosophical energy dominated academic Indian philosophy and determined the nature of the engagement of Indian philosophy with Western philosophy during that period.




1

### 1. भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात दया कृष्ण यांची 'अध्यात्मविषयक' मते कोणती आहेत ?

**(10-200)**

प्रो. दया कृष्ण यांनी त्यांच्या ***'भारतीय तत्त्वज्ञानाबद्दलची तीन मिथके'*** या लेखात भारतीय मिथकांविषयी चर्चा करताना '**आध्यात्मिकता**' या संकल्पनेची चिकित्सा केली आहे. त्यांच्या मते **आध्यात्मिकता (चेतनावादी), वेदप्रामाण्यता** आणि **दार्शनिक सांप्रदायिकता** अशी तीन मिथके भारतीय तत्त्वज्ञानाबाबत विस्तृत प्रमाणात पसरलेली आहेत. भारतीय तत्त्वज्ञान आध्यात्मिक आहे, हा जणूकाही स्वंयसिध्द दावा असून तो तपासणे फार महत्वाचे आहे. कारण तो इतका टोकाचा स्वयंसिध्द मानला जातो की तो सिध्द करण्यासाठी त्याच्या पुराव्याची जणू काही गरजच पडत नाही, असाही समज पसरला आहे. (तो ही अर्थातच गैरसमज आहे.)

दया कृष्णांच्या मते या दाव्याविषयी शंका घेणे सुरु केले की तो खोटा आहे किंवा किमान मिथक आहे, असे लक्षात येते. एखाद्या तत्त्वचिंतन परंपरेला - येथे भारतीय तत्त्वज्ञानाला कोणताही पुरावा न देता सरसकट शिथिलपणे अध्यात्मवादी असल्याचा गुणधर्म चिकटविणे कितपत योग्य आहे ? असा मूलभूत प्रश्न ते उपस्थित करतात.

ज्यास अंतिम सत्य म्हंटले जाते ते जड नसून चेतना अथवा जाणीव आहे, हा चेतनावाद, चिद्‌वाद अथवा आध्यात्मवाद होय. ही चेतनाच आद्य, मूळ असून त्यामुळेच ती सर्वात महत्वाची आहे, असे मानले जाते.या अंतिम सत्याशिवाय बाकीचे सारे विश्व हा फक्त आभास आहे, असेही यात गृहीत धरले जाते.

तथापि दया कृष्णांच्या मते, या अर्थाने पाहता भारतीय दर्शनांना आध्यात्मिक म्हणता येत नाही. कारण प्रत्येक दर्शनाने विश्वाचे अस्तित्व मान्य करुनच सत्ताशास्त्र व ज्ञानशास्त्र मांडले आहे.अर्थात असे नाही की या दर्शनांनी चेतना नाकारली आहे, प्रत्येक दर्शन चेतनेचे अंतिम सत्यत्व आणि जडाचे अस्तित्व अशा दोन्ही गोष्टी स्वीकारते.

(a) चार्वाक दर्शन *अंतिम सत्य* या अर्थाने चेतना नाकारतात. पण ते सुध्दा मानवी जाणीवेचे स्थान मान्य करतातच.प्रत्येक दर्शन जडाचे म्हणजे विश्वाचे अस्तित्व स्वीकारते.

(b) दुसरे असे की, जैन, वैशेषिक व सांख्य हे अगदी ठळकपणे व थेटपणे जड विश्व स्वीकारतात. वैशेषिक दर्शन हे तर जणू काही चार्वाकांचा विस्तार आहे, असे दयाकृष्णांचे मत आहे.

(c) तिसरे असे की न्याय - मीमांसा दर्शन तर वैशेषिकांच्या पदार्थ विज्ञानात स्वत:ची भर घालते.त्यामुळे ही दर्शन फक्त 'आत्मा' या चेतनतत्वावरच विश्वास ठेवतात, असे म्हणता येत नाही.

(d) चौथे म्हणजे बौध्द दर्शन देखील केवळ जगाचे अस्तित्व मान्य करून अनित्यतावाद मांडतात, अपवाद फक्त योगाचारी बौध्द संप्रदायाचा. पण ते मानवी चेतनेच्या विज्ञानाबद्दल म्हणजे चेतनेच्या मानवाला होणाऱ्या ज्ञानाची चर्चा करतात.

---

(e) दया कृष्णांच्या मते वेदांत तत्त्वज्ञान म्हणजे केवळ शंकराचार्यांचा वेदांत मानणे, हा सुध्दा गैरसमज किंवा मिथकच आहे.रामानुज आणि मध्वाचार्य हे तत्त्वज्ञ स्वत:ला वेदांती म्हणवून घेतात, पण त्याच वेळेस जडाचे आणि मानवी श्रध्देचे आधारभूत म्हणून भक्ताला पावणाऱ्या मूर्त ईश्वराचेही अस्तित्व मान्य करतात. म्हणजेच जड शरीरधारी ईश्वर स्वीकारतात.

ही सारी वस्तुस्थिती लक्षात घेता दयाकृष्णांच्या मते, संपूर्ण भारतीय तत्त्वज्ञान आध्यात्मिक आहे, *असे म्हणता येत नाही.*

अर्थात नीतीनियमांच्या बाबतीत भारतीय तत्त्वज्ञान आध्यात्मिक आहे, असे म्हणता येते; पण ते ही फारच मर्यादित अर्थाने. उदाहरणार्थ, दया कृष्णांच्या मते,

(1)मोक्ष ही संकल्पना अंतिम साध्य मानली गेली खरी. पण ती केवळ तत्त्वज्ञानाचे ध्येय नसून विविध तत्वपरंपरांनी बनलेल्या साऱ्या व्यापक भारतीय संस्कृतीचेच वैशिष्ट्य आहे. तत्त्वज्ञानाने तिला फक्त आकार दिला आणि मान्यता दिली.

(2) आधी धर्म, अर्थ व काम हे तीनच पुरुषार्थ होते, मान्यतेनंतर माक्षाला चौथ्या परुषार्थाचा दर्जा मिळाला.

(3) शिवाय मोक्ष ही संकल्पना वेदांताची नसून सांख्य, बौध्द व जैन परंपरेतून आलेली आहे.

(4) मोक्षाच्या रूपाने नीतीला आध्यात्मिक दर्जा मिळाला, पण मर्यादित अर्थाने.



## 2. दया कृष्ण यांच्या मते 'प्रामाण्य ' या संकल्पनेचे भारतीय तत्त्वज्ञानातील स्थान काय आहे? (5-50)

प्रो. दया कृष्ण यांनी त्यांच्या ***'भारतीय तत्त्वज्ञानाबद्दलची तीन मिथके'*** या लेखात भारतीय मिथकांविषयी चर्चा करताना 'प्रामाण्य' या संकल्पनेची चिकित्सा केली आहे. त्यांच्या मते हे दुसरे मिथक आहे. येथे 'प्रामाण्य' याचा अर्थ 'वेदप्रामाण्य' होय (किंवा उलट). दया कृष्णांच्या मते प्रामाण्याविषयी मूलभूत चर्चा करावयाची असल्यास काही प्रश्न नव्याने उपस्थित करावे लागतील. उदाहरणार्थ 'वेदांचे स्वरूप  काय ? ', 'वेदांना नेमक्या कोणत्या कालखंडात प्रामाण्य लाभले ? ', 'वेदांच्या नेमक्या भागांना प्रामाण्य आहे आणि कोणत्या भागांना नाही ?', असे प्रश्न उपस्थित केले पाहिजेत.

दया कृष्ण  असे दाखवून देतात की, खुद्द मीमांसकांचे तत्त्वज्ञान हेच वैदिक तत्त्वज्ञान नाही. कारण वेदांमध्ये कोणत्याही तत्त्वज्ञानाचा समावेश होत नाही. दुसरे असे की शंकराचार्यांसह सर्व वेदांती तत्त्ववेत्ते वेदांच्या ऐवजी वेदांचा भाग नसलेल्या उपनिषदे, गीता आणि ब्रह्मसूत्रे यांना प्रमाणभूत मानतात. वेदांना ते दुय्यम स्थान देतात.

थोडक्यात, दया कृष्णांच्या मते, वेदांचे कट्टर समर्थक मीमांसक (पूर्वमीमांसक)आणि सर्व वेदांती (उत्तरमीमांसक) हे दोन्ही पक्ष वैदिक साहित्यातील काही ठराविक भागांनाच 'वेद' म्हणतात. एवढेच नव्हे तर वेदातील सर्व विषयांना नव्हे तर केवळ ठराविक विषयांसाठीच ते 'वेद' ही संज्ञा वापरतात.अशाप्रकारे 'वेद' ही संज्ञाच मुळात मर्यादित असल्यामुळे वेदप्रामाण्य सुध्दा मर्यादित, संकुचित ठरते. म्हणूनच वेदप्रामाण्याचा दावा खोटा ठरतो. वेदप्रामाण्य हे मिथक बनते.

## 3. भारतीय तत्त्वज्ञानातील 'संप्रदाय' ही संकल्पना. (5-100)

सांप्रदायिकता हे दयाकृष्णांच्या मते तिसरे मिथक आहे.दार्शनिक संप्रदाय याचा अर्थ वेदांच्या आधारे केलेले वैदिक आणि अवैदिक हे ढोबळ वर्गीकरण होय.दया कृष्णांच्या मते हे वर्गीकरण किंवा हे संप्रदाय जणू काही अंधश्रध्दा म्हणूनच स्वीकारले गेले आहेत.या संबंधात फक्त कार्ल पॉटर[1] या जगप्रसिध्द तत्त्ववेत्त्याने त्यांच्या Presuppositions of India's Philosophies (1963) या ग्रंथात वेगळ्या प्रकारची मांडणी करून काहीसे वैविध्य आणले आहे. पण त्यांनी सुध्दा या संप्रदायिकरणाबद्दल मूलभूत शंका उपस्थित केलेली नाही, असा आक्षेप नोंदवून दया कृष्ण त्यांचे स्वत:चे मत पुढीलप्रमाणे देतात.

---

[1]कार्ल पॉटर Karl H. Potter, Professor Emeritus ,University of Washington, Seattle, WA 98195. कार्ल पॉटर यांच्या मार्गदर्शनाखाली 'भारतीय दर्शनांचा विश्वकोश '(The *Encyclopedia of Indian Philosophies*) हा महाप्रकल्प राबविण्यात येत आहे.चाळीस वर्षांपूर्वी 1970 साली सुरुवात झालेल्या या प्रकल्पांर्तगत एकूण 28 खंड प्रकाशित होणार आहेत.याची पहिली आवृत्ती 1970, दुसरी 1983 आणि तिसरी 1995 साली प्रसिध्द झाली अधिक माहितीसाठी या वेबसाईटवर जा : http://faculty.washington.edu/kpotter/

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege. org, 9226563052*

---

दया कृष्णांच्या मते, संप्रदायाची संकल्पना ही वेदप्रामाण्याच्या कल्पनेशी घनिष्ठपणे जोडली गेली आहे. म्हणजेच एका मिथकाशी दुसरे मिथक जोडले गेले आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास, दर्शन आणि सादरीकरणाची शैली या संकल्पनांबाबतही अनेक गैरसमज आहेत, असे ते म्हणतात.

दया कृष्णांच्या मते वेदप्रामाण्य अंतिम मानले तर दर्शने बंदिस्त बनतात, त्यांच्यात कधीही कसलाही बदल होणार नाही, असे मानावे लागते.पण इतिहास हा तर नेहमी बदलत असतो; त्यामुळे 'भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास' या संकल्पनेला अर्थ उरत नाही. परिणामी त्या नावाखाली जे शिकविले जाते तेही निरर्थक बनते. दुसरे म्हणजे जर समजा 'प्रामाण्य' नाकारले तर 'दर्शन' ही संकल्पनाही नाकारली जाते.तिसरी गोष्ट अशी की दर्शनांची नास्तिक-आस्तिक मांडणी पाहता त्यांची विभागणी करणे शक्य आहे, हे उघड आहे. पण विचार जर असे विभागले जात असलतील तर त्यांच्यात बदल होतो आहे, असे मानावे लागते.चौथी गोष्ट म्हणजे कुण्या एका तत्त्ववेत्त्याने एक दर्शन अथवा सगळी दर्शने विकसित केली, असे नाही तर अनेक शतके अनेकांकडून त्यांची रचना होत गेली.पण या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून जणू काही दर्शने संपूर्ण, परिपूर्ण, अंतिम आणि कधीही बदल न होणारी आहेत, अशी वागणूक त्यांना दिली जाते. हे सारेच चुकीचे आहे.

हा सारा सांप्रदायिकतेचा मुद्दा खरे तर 'भारतीय तत्त्वज्ञानातील तथाकथित सांप्रदायिकतेकडे कशाप्रकारे पहावे ? ' हा आहे. या दृष्टिकोनातच बदल घडविणे नितांत गरजेचे आहे, असे प्रो. दयाकृष्णांचे मत आहे. मग 'भारतीय तत्त्वज्ञानाकडे कसे बघावे ?' तर त्यांच्या मते साधारणपणे दोन दृष्टिकोनातून भारतीय तत्त्वज्ञानाकडे पाहाता येईल.

A) पहिला असा की 'भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे विविध विचारवंतांनी एकमेकांच्या विचारांची तुलना करीत मांडला आहे.'
B) दुसरा असा की 'भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे विविध विचारवंतांनी काळाच्या ओघात विकसित केलेले केवळ विचार आहेत.हा या विचारांचा विकासक्रम आहे. या पैकी कोणताही दृष्टिकोन पाहाता भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास हा पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासापेक्षा वेगळा आहे, असे म्हणता येत नाही. म्हणजेच भारतीय संस्कृतीचे वेगळे वैशिष्ट्य राहात नाही.

---